स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (Ph.D.) पदवीसाठी
सादर करण्यात आलेला संशोधन आराखडा

भारतातील आर्थिक सुधारणा व समावेशक आर्थिक विकास एक विश्लेषणात्मक अभ्यासः १९९१ ते २०१५

An Analytical Study of Economic Reforms and Inclusive Economic Development in India: 1991 to 2015

संशोधक

प्रा. वडगावे व्यंकट जनार्दन

M.A., B.Ed., M.Phil. SET, NET

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि. पुणे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. मुळे शाहुराज सुग्रीव

M.A., B.Ed., SET, Ph.D.

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय

बाभळगाव, ता. जि. लातूर

संशोधन केंद्र

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

उप–केंद्र, लातूर

(मार्च २०१६)

प्रस्तावना :

परकीय चलनाची समस्या सोडविण्यासाठी, व्यवहारतोलाचे संकट दूर करण्यासाठी, राजकोषिय तूटीची समस्या कमी करण्यासाठी, चलनवाढीवर नियंत्रण मिळविण्यासाठी या एका किंवा अनेक कारणांसाठी भारताने जागतिक व्यापार संघटना, जागतिक बॅंक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या अटी मान्य करून आर्थिक सुधारणांची प्रक्रिया चालू केली. या आर्थिक सुधारणा चालू केल्यानंतर निर्माण होणाऱ्या आव्हानांची व संधीची कोणतीही पूर्व तयारी केली गेली नव्हती. प्रगत देशातील लोकसंख्या कमी व त्यांची सिमांत उपभोग प्रवृत्ती (MPC) कमी असल्याकारणाने गुंतवणूक गुणकाचा आकार (Multiplier Size) कमी होऊन राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा दर कमी होऊ शकतो, यासाठी या प्रगत देशांना वस्तू व सेवांची मोठी बाजारपेठ उपलब्ध करण्याच्या उद्देशाने WTO, IMF, World Bank या संघटनांनी भारताला खुल्या अर्थव्यवस्थेचा स्विकार करण्यास भाग पाडले. **युद्ध सामग्रीसाठी मोठी बाजारपेठ ते आशिया खंडात राजकीय अस्थिरता निर्माण करून उपलब्ध करून देऊ शकले, त्याचबरोबर उपभोग्य वस्तू व सेवांसाठीसुद्धा मोठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशांनी प्रगत देशांनी या जागतिक संघटनांचा वापर करून घेतला आहे.** आंतरराष्ट्रीय अर्थकारणाच्या व राजकारणाच्या दबावामुळे १९९४ मध्ये भारताला जागतिक व्यापार संघटनेच्या करारावर स्वाक्षरी करावी लागली. भारताने काही विचार विनिमय करून स्वाक्षरी केली असेल म्हणून म्हणून दुसऱ्याच दिवशी ७७ विकसनशिल देशांनी या करारावर स्वाक्षरी केली. व्यापक स्वरूपात जागतिक पातळीवर आर्थिक सुधारणांची सुरूवात होण्यास सुरूवात झाली. भारतामध्ये License Permit Kota Raj पद्धतीला मर्यादा घालण्यात आल्या. विदेशी गुंतवणुकीवरील मर्यादा शिथिल करण्यात आली. तोटयात असलेल्या सार्वजनिक उद्योगांकरता निर्गुंतवणूकीचे धोरण अवलंबण्यास सुरूवात झाली. अशा प्रकारे व्यापक स्वरूपात सुधारणांना सुरूवात करण्यात आली.

प्रथम योजनेपासून दहाव्या योजनेपर्यंत रोजगार निर्मिती, संधीची समानता, सामाजिक न्यायासह आर्थिक वाढ, समतोल प्रादेशिक विकास, दारिद्रय निमूर्लन, शिक्षणाची समानता इत्यादी उद्दिष्टये साध्य

करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. एकंदरीत विकास प्रक्रियेत वंचित घटकांना सामावून घेण्याच्या प्रक्रियेची व्युव्हरचना आखण्यात आली. अकराव्या व बाराव्या योजनेपासून जलद, सर्वसमावेशक आर्थिक विकास याअंतर्गत पुर्वीच्या योजनेतील ही उद्दिष्ठे एकत्रितरित्या पूर्ण करण्यासाठी प्राधान्य देण्यात आले.

विषय निवडीची आवश्यकता :

आर्थिक सुधारणेनंतरच्या कालखंडात वरील उद्दिष्ये पूर्ण करण्यासाठी नवीन आव्हाने व संधी उभ्या राहिल्या. आर्थिक सुधारणा विकास प्रक्रियेत वंचित घटकांना सामावून घेत आहेत का नाही याचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. आर्थिक सुधारणेमधील कोणते घटक सर्वसमावेशक विकासाला प्रेरक आहेत व कोणते घटक सर्वसमावेशक विकासाला प्रतिकुल आहेत याचा आढावा घेणे खुप महत्वाचे आहे.

राजकोषिय सुधारणा, मौद्रिक सुधारणा, औद्योगिक सुधारणा, वित्तीय सुधारणा, परकीय व्यापार धोरण सुधारणा या प्रमुख आर्थिक सुधारणा आहेत. या सुधारणांमुळे आर्थिक विकासाची गती वाढली आहे. मात्र त्याचा लाभ सर्वानाचा झाला नाही. देशपातळीवर विचार करता क्षेत्रिय विषमता वाढीस लागली आहे. जी राज्य मागास व विकासापासून वंचित होती त्या राज्यांचा आर्थिक सुधारणांच्या कालखंडात जास्त विकास झालाच नाही. राज्याराज्यात औद्योगिक विकासाची वाढ विषम राहीली. कृषि, उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासाच्या संरचनेत विषमता निर्माण होत आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत प्रथम प्राथमिक क्षेत्राचा विकास होत असतो त्यानंतर द्वितीय क्षेत्राचा विकास होत असतो आणि शेवटी सेवा क्षेत्राचा विकास होत असतो. मात्र औद्योगिक क्षेत्राच्या विकासाच्या वेगापेक्षा सेवा क्षेत्राच्या विकासाचा वेग जास्त राहीला आहे. अर्थव्यवस्थेच्या सर्वसमावेशक विकाससाठी प्राथमिक, द्वितीयक व तृतीय क्षेत्राचा विकास विशिष्ट क्रमाने झाला पाहिजे. औद्योगिक क्षेत्राच्या विकासापेक्षा सेवा क्षेत्राचा विकासाचा दर जास्त असल्यामुळे सर्वसमावेशक आर्थिक विकास होण्यासाठी आवश्यक अनुकूल परिस्थिती निर्माण होत नाही.

अभ्यास विषयाची उद्दिष्टये :

१) आर्थिक सुधारणा व समावेशक आर्थिक धोरणांचा अभ्यास करणे.

२) आर्थिक सुधारणा व कृषि, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील रोजगार निर्मिती यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३) आर्थिक सुधारणा व समावेशक आर्थिक धोरणांचा दारिद्रय निर्मुलनावरील परिणामाचा अभ्यास करणे.

४) आर्थिक सुधारणा व कृषि, उद्योग आणि सेवाक्षेत्र यांच्यातील क्षेत्रिय विषमतेचा अभ्यास करणे.

५) आंतरराष्ट्रीय करार संघटनांचा (WTO, IMF, World Bank) आर्थिक सुधारणा व समावेशक आर्थिक विकासावरील प्रभावांचा अभ्यास करणे.

६) भारताचा समावेशक विकास होण्यासाठी धोरणात्मक उपाय सुचविणे.

अभ्यास विषयाची गृहीतके :

१) आर्थिक सुधारणेत्तरच्या कालखंडात समावेशक विकासाचा वेग खुपच कमी राहीला आहे.

२) आर्थिक सुधारणा व समावेशक आर्थिक विकासाच्या धोरणामुळे रोजगार निर्मितीत वाढ झाली.

३) आर्थिक सुधारणा व समावेशक आर्थिक विकासाच्या धोरणामुळे दारिद्रयात घट झाली.

४) आर्थिक सुधारणा व समावेशक आर्थिक विकासाच्या धोरणामुळे क्षेत्रिय विषमता वाढीस लागली आहे.

५) आंतरराष्ट्रीय संघटना व आंतरराष्ट्रीय आर्थिक घडामोडीमुळे आर्थिक सुधारणा प्रभावीत होत आहेत.

संशोधनाची व्याप्ती :

आर्थिक सुधारणांना सुरूवात केल्याच्या कालखंडापासून १९९१ ते २०१५ या २५ वर्षाचा कालखंड विचारात घेण्यात येणार आहे. **भारतात कृषि, उद्योग व सेवा** या क्षेत्रात झालेल्या व करण्यात येत असलेल्या विविध आर्थिक सुधारणांचा व समावेशक आर्थिक विकास यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

समावेशक कृषि योजना: शेती विस्ताराच्या योजना, विमा योजना, मृदा संधारण योजना, कृषि प्रक्रियासंबंधी योजना, इ. योजनांपैकी विकासप्रक्रियेतून वंचित असणाऱ्या शेतकऱ्यांसाठीच्या काही निवडक योजनांचाच अभ्यास करण्यात येईल.

समावेशक औद्योगिक विकासाच्या योजना: समावेशक विकासासाठी ज्या औद्योगिक योजना आहेत त्यांचा अभ्यास.

समोवशक सेवा क्षेत्राच्या योजना: सेवा क्षेत्राच्या विविध योजनापैकी समावेशक विकासाच्या ज्या योजना आहेत त्याचाच विचार करण्यात येणार आहे.

संशोधनाच्या मर्यादा :

संशोधन कार्यासाठी भारत देशाची निवड करण्यात आली आहे. त्यामुळे या संशोधनावरून मिळणारे निष्कर्ष समग्र स्वरूपाचे असतील. त्याचबरोबर संशोधनसाठी १९९१ ते २०१५ या कालावधीचा घेण्यात येणार आहे. कृषि, उद्योग व सेवा क्षेत्र विकासाच्या ज्या योजना समावेशक आर्थिक विकासाला प्रेरक आहेत त्याच योजनांची सांख्यिकीय माहिती घेण्यात येणार आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन कार्य करण्यासाठी ''तुलनात्मक संशोधन पद्धतीचा'' (Comparative Research Method) वापर करण्यात येणार आहे. या संशोधक पद्धतीच्या माध्यमातून प्रस्तूत संशोधनातील परस्परावलंबी चलामध्ये असणाऱ्या कार्यात्मक परस्पर संबंधाचा (Functional Correlation) विश्लेषणात्मक अभ्यास केला जाईल.

माहिती संकलन पध्द्ती :

संशोधनासाठी आवश्यक असणारी सांख्यिकीय माहिती गोळा करण्यासाठी दुय्यम माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे. भारत सरकारचे प्रकाशित होणारे विविध अहवाल, रिझर्व्ह बॅकेचे अहवाल, आर्थिक सर्वेक्षण, भारत सरकारचे विविध औद्योगिक धोरणे, जागतिक व्यापार संघटनेचे अहवाल, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे अहवाल, जागतिक बॅंकेचे अहवाल इ.

संशोधन प्रकरणांची रूपरेषा:

प्रकरण १ ले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयात वापरण्यात येणाऱ्या विविध मुलभूत संकल्पनाची माहिती, भारत सरकारचे १९९१ पूर्वीचे आर्थिक धोरण व १९९१ नंतरच्या विविध आर्थिक सुधारणा, समावेशक विकासासाठीच्या विविध योजना, इत्यादींची सविस्तर मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण २ रे : संशोधन पद्धती व संदर्भ साहित्याचा आढावा

या प्रकरणामध्ये संशोधन पद्धती, संशोधनाची उदिष्टये, गृहितके आणि संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण ३ रे : कृषि, उद्योग व सेवा क्षेत्रातील विविध आर्थिक सुधारणा व समावेशक आर्थिक विकास

कृषि, उद्योग व सेवा क्षेत्रातील विविध आर्थिक सुधारणा व समावेशक आर्थिक विकास यांच्या संबंधी सांख्यिकीय माहिती व त्या माहितीचे विश्लेषण या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण ४ थे : आर्थिक सुधारणा व समावेशक आर्थिक विकास धोरणांचा रोजगार, दारिद्रय व क्षेत्रिय विकासावरील परिणाम

या प्रकरणामध्ये आर्थिक सुधारणा आणि कृषि, उद्योग, सेवा क्षेत्रातील रोजगार निर्मिती, आर्थिक सुधारणांचा क्षेत्रिय समतोल विकासावरील परिणाम, आर्थिक सुधारणांचा दारिद्रय निर्मुलनावरील परिणाम इत्यादी संबंधी सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रकरण ५ वे : आंतरराष्ट्रीय करार संघटना व आर्थिक सुधारणा

या प्रकरणामध्ये जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक या आंतरराष्ट्रीय संघटनानी भारत सरकारशी केलेले विविध आंतरराष्ट्रीय करार व या करारांचा भारतातील आर्थिक सुधारणा व समोवशक आर्थिक विकासावरील प्रभावांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ६ वे : निष्कर्ष व उपाय योजना

या प्रकरणामध्ये संशोधन कार्यातून निघालेल्या निष्कर्षाचे विश्लेषण करून भारताच्या समावेशक विकासातील अडथळे व ते अडथळे दूर करण्यासाठी उपाय योजनांची मांडणी करण्यात येणार आहे.

संदर्भ सूची :

1) Indian Economy, Rudra Datt-KPM Sundram, S.Chand Publication, New Delhi, 38th Edition- 2012.

2) Indian Economy, Pratiyogita Darpan

3) Agriculture Economics, Dr. Jay Prakash Mishra, Shahitay Bhavan Publication

4) Dr. Pawan Kumar Oberoi, 'Research Methodology' Global Academic Publishers & Distributors, New Delhi, First Edition 2013

5) Mishra S. K., Puri V. k., Economics of Development and Planning (Theory and Practices) Himalaya Publishing house,

6) Economic survey of India 2014-15

7) WTO (2014), International Trade Statistics, World Trade Organization.

8) IMF Report (World Economic Outlook, Regional Economic Reports, IMF Annual Report)

9) The World Bank Report – world Development Report 2015

१०) प्रा. कोळंबी, 'भारतीय अर्थव्यवस्था' भगिरथ प्रकाशन – पूणे, आवृत्ती २०१५.

११) डॉ. कऱ्हाडे बी.एम., 'शास्त्रीय संशोधन पध्द्ती', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती, जानेवारी२००७.

मार्गदर्शक
प्रा. डॉ. मुळे शाहुराज सुग्रीव
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय,
बाभळगाव, ता. जि. लातूर

संशोधक
प्रा. वडगावे व्यंकट जनार्दन
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती